SNUK

Where tireless striving stretches its arms towards perfection

सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व
उमाशंकर खेतान वाणिज्य
महाविद्यालय,अकोला.

# शब्दसुधा

वार्षिकांक २०२३-२४

























सुधाकरराव नाईक कला , विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय,अकोला.

# शब्दसुधा

## २०२४

■ आमचे प्रेरणास्थान ■

मा. बी. पी. पवार

संस्थापक सचिव, सु. ना. कला, विज्ञान व उ. खे. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

■ मार्गदर्शक ■

प्राचार्य डॉ. जयंत बोबडे

■ संपादक ■

डॉ. भास्कर पाटील, प्रा. नेमीचंद चव्हाण

■ सह संपादक ■

प्रा. डॉ. गजेंद्र वासनिक, प्रा. डॉ. नितीन देऊळकार

■ संपादक मंडळ ■

**कु.प्रेरणा डहाणे, कु.प्रिया पांडे, आनंदगोविंद सपकाळ, आनंद राठोड**
**आकाश उमाळे, सुरज राठोड, कु.दिव्या इंगळे, कांचन कोगदे**

: प्रकाशक :

प्राचार्य डॉ. जयंत बोबडे

मुखपृष्ठ : हेमंत राठोड

मुद्रक : योगिनी प्रिंट्स, मलकापूर, अकोला

(या अंकामध्ये प्रसिध्द झालेले लेखन हे त्या-त्या लेखकाचे, कवीचे असून संपादक मंडळ या लेखनास सहमत असेलच असे नाही. )



S.N. Arts & U.K. Commerce College * Library, Akola * Seal

# ... शुभेच्छा संदेश ...

शामकी माता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, उमरी (बु.) जि. वाशिम व्दारा संचालित असलेल्या अकोला स्थित सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' शीर्षकाचा वार्षिकांक ( २०२३ - २४ ) प्रकाशित होत असल्यामुळे; मला शुभेच्छा देतांना फार आनंद होत आहे. प्राचार्य आणि संपादक मंडळाने महाविद्यालयीन तरुणांना आपले हक्काचे विचारपीठ 'शब्दसुधा' च्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिनंदन...... विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना लिहिते करण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती या संपादकीय मंडळाने स्वीकारली. त्या माध्यमातून त्यांचे विचार, भाव-भावना व्यक्त करण्याची ही मोठी उपलब्धी या माध्यमाने यशस्वी होत आहे. या अंकामध्ये समाविष्ट झालेले लेखन चांगल्या प्रकारचे आहेच. तरीही मला असे वाटते की, पुढील अंकामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये घडलेले सुखद किंवा दुःखद अनुभव शब्दबध्द करावेत. सोबतच बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, लोकगीते, महापुरुषांचे प्रेरणादायी विचार यांचे संकलन -आकलन करुन, विद्यार्थ्यांनी आपली लेखन कौशल्यता वाढवावी. याच हेतूने आम्ही महाविद्यालयात स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध करुन दिली आहे, त्याचा जरुर लाभ घ्यावा.

मला आनंद आहे की या अंकामध्ये समकालीन प्रश्न मांडणारे लेखन यांचा समावेश झाला आहे. विद्यार्थ्यांनी सतत लिहित, वाचत राहिले पाहिजे. शेवटी जीवन काय आहे, याचा सार व्यक्त करणारा एक संदेश समाजमाध्यमावर फिरला, तो मला खूप भावला, तो आपण सर्वांना संदेश पुरक ठरेल, यासाठी आपल्यापुढे साभार व्यक्त करतो. जीवनातील सात सत्य - आरसा- खोटे बोलू देत नाही, सत्य- घाबरवू देत नाही, ज्ञान- मोहपाशामध्ये अडकवत नाही, विश्वास- कमकुवत होऊ देत नाही, प्रेम- व्देष करु देणार नाही, समाधान- दुःखी होऊ देणार नाही आणि कर्म- जीवनात अपयशी होऊ देणार नाही (साभार-गुगल प्ले स्टोअर) या सात सत्याचा स्वीकार करुन आपण आपले जीवन सफल करावे, जे इतरांनाही लाभदायक ठरणारे असेल. या सदिच्छांसह थांबतो.

श्री. बी. पी. पवार
(संस्थापक सचिव)
शामकी माता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, उमरी (बु.) जि. वाशिम

S.S.N. ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA



# दोन शब्द : प्राचार्यांचे
# अभिनंदन .... आणि शुभेच्छाही

२०२३ - २४ या वर्षीचा आमच्या महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक प्रकाशित होत असतांना मला अत्यंत आनंद होत आहे विद्यार्थ्यांना आपल्या मनातील विचार, त्यांचे सुप्त गुण यांचा विकास करण्यासाठी वार्षिकांक महत्त्वाचा दस्तऐवज असतो. यामुळे विद्यार्थ्यांना लिखाणाची आवड निर्माण होण्यास मदत हाते. महाविद्यालयाने 'शब्दसुधा' हा वार्षिकांक दरवर्षी प्रकाशित करुन, विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असतो. विद्यार्थ्यांची प्रगती म्हणजे महाविद्यालयाची प्रगती असते, म्हणून त्यांचा व्यक्तिगत विकास व्हावा या करिता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग व विविध अभ्यास मंडळांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात.

महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रस्थान मानुन विविध कार्यक्रम राबविले. यात विविध कार्यक्रमाचा समावेश आहे, ज्याची नोंद या अंकातील वार्षिक अहवालातून दिसून येते. यात समाविष्ट लेख हे विद्यार्थ्यांची लेखन व आकलन क्षमता सिद्ध करणारे आहेत. त्यातून इतरही विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच त्यांचे विचार शब्दबध्द करण्याचे कार्य हा 'शब्दसुधा' अंक निश्चितच करीत आहे. विद्यार्थ्यांच्या लेखनास या अंकातून प्रसिद्ध करुन, त्यांना हक्काचे विचारपीठ आमच्या 'शब्दसुधा' वार्षिकांच्या संपादक मंडळाने उपलब्ध करुन दिलेले आहे. संपादक मंडळाने अतिशय मेहनतीने, आकर्षक आणि वाचनीय अंक संपादित करुन दिला, त्याबद्दल या अंकाचे संपादक डॉ. भास्कर पाटील, प्रा. नेमीचंद चव्हाण तसेच वार्षिकांक समिती सदस्य डॉ.गजेंद्र वासनिक, डॉ. नितीन देउळकार या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो. या अंकाच्या पुढील वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

प्राचार्य डॉ. जयंत बोबडे

सु. ना. कला, विज्ञान व उ. खे. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.



AKOLA

# संपादकीय...

प्रिय रसिक वाचक मित्रांनो, आपल्या महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ चा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना विद्यार्थ्यांनी आपल्या अंतःकरणात दडलेल्या सुप्त गुणांना शब्दसुधाच्या माध्यमातून आविष्कृत केले आहे. शब्दसुधाचे संपादक या नात्याने आम्हाला खेद वाटतो की, दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचे वाचन आणि लेखन कौशल्याचे विस्मरण होत आहे, तरी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या वर्षीच्या अंकामध्ये जे साहित्य लेखन केले आहे ते उत्कृष्ठच आहे.

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना उत्तम गुणांची पदवी प्राप्त करणे हे प्रत्येक विद्यार्थ्यांचे ध्येय असायला हवे. त्यासोबतच कला, क्रीडा, साहित्य लेखन, ह्या क्षेत्रातील ज्ञान, आनंद मिळविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. व्यक्तिमत्त्व विकासासाठी हे सर्व आवश्यक आहे. पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर, सामाजिक जीवनात वावरतांना, महाविद्यालयातील हा सर्वकश अनुभवच तुम्हाला एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणार आहे.

'शब्दसुधा' हा वार्षिकांक सुंदर आणि आकर्षक करण्यासाठी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव, श्री. बी. पी. पवार सर, मा. प्राचार्य डॉ. जयंत बोबडे सर, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संपादक मंडळातील सदस्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या उत्स्फूर्त व सक्रिय सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. या अंकात समाविष्ट सर्व कवी - लेखक व संकलक यांचे सहर्ष अभिनंदन.

हा अंक प्रसिद्ध करण्यासाठी संपादक मंडळावर प्राचार्यांनी जो विश्वास दाखविला, स्वातंत्र्य दिले, त्यामुळेच अंक अधिक सुबक करण्यास संपादकांना आनंद वाटला. त्यासाठी महाविद्यालयाचे व संस्थेचे संपादक मंडळाकडून आभार. या अंकास अधिक आकर्षक करण्यासाठी हेमंत विजय राठोड व उमेश राठोड यांनी छायाचित्र सजावट करुन दिली. तसेच योगिनी प्रिंट्सचे श्री गजानन वाघमारे यांनी अंक सुबक व दर्जेदार करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आभार व या अंकातील त्रुटीबद्दल क्षमस्व !

- संपादक मंडळ

AKOLA

समाजसेविका योगीनी आपटे यांची मुलाखात
मुलाखातकर्ते – गजानन गोपाल निलाखे, बी.ए.भाग-१

★ सौ. योगिता आपटे या २५ वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करतात 'कुटुंब व बालकल्याण' हया विषयात MSW (Master in Social Work) ही पदवी घेऊन १९९५ पासून कार्यरत आहेत. सध्या Persident Foundaton येथे CSR Head म्हणून काम पाहतात व महिलांविषयी काम करण्यात त्यांना विशेष रूची आहे त्यांच्या प्रदीर्घ अनुभव, कार्य याविषयी व काही अवांतर गप्पा. तुम्ही मुळच्या कुठल्या, बालपण कुठे गेलं, लहानपणीच्या काही आठवणी सांगाल का ?

★ मी पुण्याची आहे आणि माझं बालपण हे पेठेत गेलं. आम्ही वाडयात राहायचो घरी आई बाबा आणि आम्ही तिन्ही बहिणी असे आमचे कुटुंब, काका, मामा, आत्या, मावशी अशा सगळया नातेवाईकांचे घरी नियमितपणे येणे जाणे असायचे. नातेवाईकांकडुन घरात तिन्ही मुलीच असण्यावरून गंमतीत का होईना पण बोलणे आम्हाला ऐकू यायचं. शाळेत शिक्षक होते. त्यामुळे घरात दोन्हीकडच्या आजी आजीबाजी आई वडिलांनी सुध्दा आम्हाला कुठल्यांही प्रकारे ते जाणवू दिले नाही. आम्हाला जसं त्यांनी जोपासंल, जसं वाढवलं त्या सर्व प्रकियेमध्ये आम्ही म्हणूनच आज आम्ही जे मिळवू शकलो ते त्यांच्यामुळेच असं मला वाटतं. मी शाळेत अभ्यासात खूप काही हुशार किंवा खूप मार्कांनी पास होणारी मुलगी नव्हते. १० वी ची परीक्षा जेव्हा दिली तेव्हा मात्र मला लक्षात आलं की आपला आपण अभ्यास करायचा असतो. आपल्याला पुढे जर काही करायच असेल तर अभ्यासा व्यतिरिक्त काही पर्याय नाही. कोणी आपल्यासाठी काही काढून ठेवलं नाही की ज्याच्या जीवावर आपण मोठे होऊ. आपण शिक्षण आणि आपल व्यक्तिमत्व या दोनच गोष्टी आपल्याला साथ देतील. त्यानंतर मात्र मी परत मागे वळून बघितल नाही मी जे काही करत गेले त्यात घरच्यांनी पण साथ दिली. मला ज्याची आवड होती ते करत गेल्यामुळे त्याचा मला आंनद वाटत आला आहे.

★ तुमचं महाविद्यालयीन शिक्षण कुठे झाले त्याचे निर्णय कसे घेतले ?

★ आताच्या मुलांना पुढे जाऊन काय करायच याची स्पष्टता असते, तेवढी मला नव्हती. पण ढोबळमानाने आपल्याला काय करायचं हे माहिति होत. माझे आजोबा शिक्षक होते आणि माझी प्रेरणाही । म्हणून मला त्यांच्यासारख शिक्षक व्हांव असं वाटायचं, दुसर म्हणजे मला समाजकार्याची ओढ होती कारण मी १० वी ला असतांना शाखेमध्ये जात होते. तेव्हा पासून तो प्रवास सुरू झाला की आपण या क्षेत्रात काहीतरी केल पाहिजे त्यासाठी नेमक काय शिक्षण घेता येईल हे बघुयात आणि तिसरी गोष्ट माझ्या मनात होती की पोलीस व्हायंच म्हणून मी एस पी महाविद्यालयात आर्टस शाखेत प्रवेश घेतला प्रवेश प्रकिया तेव्हा सोपी होती फक्त मार्कशिट दाखवून आणि रू. ८५०/– भरून झाली आणि कॉलेज सुरू झाले.

★ एमएसडब्ल्यु आणि सामाजिक कार्याची सुरूवात कशी झाली ?

★ एनएसएस मध्ये अनेक कॅम्पस असायचे. माझे ०५ वे वर्ष असताना एका कॅम्पमध्ये सामाजिक काम करणाऱ्या एक ताई आलेल्या त्या ससुनमध्ये काम करायच्या. तेथे येऊन त्यांनी त्यांच्या कामाचं स्वरूप सांगितलं, तेव्हा आम्ही त्यांना विचारलं की तुमचं काय शिक्षण झालयं तेव्हा मला एमएसडब्ल्यूची माहिति मिळाली. त्यावेळी पुण्यात फक्त कर्वे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये एमएसडब्ल्यू शिकवलं जात होत. त्याची प्रवेश परीक्षा असायची तेव्हा हे आमच्यासाठी नवीन होत. मग त्यात नक्की काय प्रश्न विचारतील त्याची तयारी काय केली पाहीजे याची भीती वाटत होती. तेव्हा तिथे चार विषयांमध्ये विशेषतः होती प्रत्येक विशेषसतेसाठी २० मुलांची जागा होती. इथे मला एनएसएस चा फायदा झाला तो असा की Republic Parade मध्ये भारतातील सर्व राज्यामधून ४ ते ५ प्रतिनिधी निवडतात ज्यांना महिनाभर एकत्र राहायची आणि २६ जानेवारीला राजपथ येथील परेडमध्ये संधी मिळते तिथे आम्हाला वेगवेगळया उपकमातुन खुप शिकायला मिळालं. देशभरात नक्की काय चाललय, काय काय विचार आहेत, संस्कृती काय असते, आणि आपली मत कशी मांडावीत हे समजलं. मी तिथे महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व केलं. त्यातुन मला आत्मविश्वास मिळाला आणि जवाबदारीची जाणीवही झाली. आपण जे बोलू त्यावरूनच आपल परिक्षण होणार हे तेव्हा कळलं तेव्हा समाजामध्ये एवढी प्रगती नव्हती त्यामुळे आपल्यावर एक जवाबदारी आहे आपण आपल्या राज्याचं प्रतिनिधित्व करतो त्यामुळे एक चांगली प्रतिमा झाली पाहिजे.

★ नोकरी आणि पुढील प्रवास याबल सांगा ना ?

★ नोकरी मिळेल का नाही ? कुठे मिळणार ? शोधायची कशी ? असे प्रश्न पडले होते. आधी मी ज्यांच्याकडे होती त्याच संस्थेत मला परत बोलावल पण मी फार काळ तिथे रमले नाही. विद्यार्थी म्हणून काम करणे हा फरक कळला. येथील काम करायची पध्दत मला फारशी मागवणारी नव्हती त्यामुळे मी नोकरी मिळाली तिथे मी जवळपास साडेपाच वर्षे वस्तीपातळीवर काम केल. महिला–मुले यांचे गट करणं, आरोग्याविषयी काम करणं, ते काम मोठ करत महाराष्ट्रात कसं नेता येईल ? याचं काम केल काम करत असताना महिलासाठी काम कराव अस वाटू लागले. वस्तीपातळीवर काम करत असताना वाटत होत की घरातील महिलेला ताकद दिली तर घरातील बऱ्याच गोष्टीवर परिणाम होऊ शकते म्हणून मग एका कौटुबिंक हिंसाचारावर काम करत असणाऱ्या संस्थेत १० वर्षे काम केलं. ती संस्था पोलिसांबरोबर काम करत होती. स्किमचा एक भाग म्हणून काम करत होती, माझी एक गुप्त इच्छा इथे पुर्ण झाली. त्यामधुन मला खुप शिकायला मिळाल. मी किती नशीबवान आहे हे काम करायची ताकद मला घरातून मिळत होती. तुमचं कुटुंब व त्याचा सामाजिक कार्यामध्ये कुटुंबाचा सहभाग कसा असतो ?



S.N. and U.K. COMM. COLLEGE AKOLA
S.N. and U.K. COLLEGE LIBRARY

मी माझे पती आणि मुलगी आम्ही तिघे राहतो. माझ्या बहिणी पुण्यात आहेत. माझे दीर कोकणामध्ये आहेत, काका आहेत, माझी आई आहे. तरी आम्ही वेगवेगळे राहत असलो तरी आमचे एकमेकांचे नातेसंबंध खुप घट्ट् आहेत. माझ्या कामाविषयी जर बोलयचं झालं तर माझी मुलगी जेव्हा लहान होती तेव्हा तिला फारसं माझ काम आवडायच नाही. कारण तेव्हा तिला असं व्हाग्रच की माझा कामामुळे खूप वेळ बाहेर राहाव लागत होत. माझा खूप मोठा मानसिक वेळ माझ्या कामात जायचा त्यामुळे तिच्याकडे कधीतरी दुर्लक्ष व्हायचं पण जशी तो मोठी झाली तिला आज तिच्या आईच्या कामाचा खूप अभिमान आहे. माझी शक्ती आहे. माझ्या पतीने काम करतांना मला कामं करण्याबद्दल कधी अडवलं नाही किंवा तू हे का करतेस ? याबद्दल कधी अडवलं नाही. माझ्या प्रत्येक कामामध्ये माझ्या बरोबर राहिले ते माझी प्रचंड मोठी सपोर्ट स्टीम आहेत. मी अनेकवेळा ज्या नोकऱ्या बदललेल्या आहेत. त्यानुसार रिलीफ वर्कमध्ये कामकेलं. कोरोना मध्ये काम केलं आहे. घराच काय होईल? असा प्रश्न माझ्या मनात कुठल्याही प्रसंगाच्या वेळेला कधी उमटला नाही. त्याचं संपूर्ण श्रेय माझ्या पतींना आहे कारण तुम्ही तेव्हाच अत्यंत मन मोकळेपनी जगू शकता. जेव्हा तुमच्या पाठीमागे काही विवंचना नसते.

★ सामाजिक कार्यकर्ता म्हणून काय करायला हवं आणि काय करू नये ?

★ आतापर्यंतच्या माझ्या कामाच्या अनुभवावरून एक गोष्ट माझ्या मनात कायम असते की, आताची ही सगळी परिस्थिती बदलण्याची शक्ती मला दे, काही गोष्टी आहेत ज्या मी बदलू शकत नाही ती मान्य करण्याची वृत्ती मला दे, आणि तिसरं हया दोन्हीतला फरक समजण्याची बुध्दी दे, मी कॉलेजमध्ये असल्यापासून हे सतत मनावर बिंबवत आलेली आहे. कारण असं की आज मी एखादी गोष्ट करते उद्या तीच असेल असं नाही म्हणजे आज माझी जी मानसिकता आहे ती बदलुही शकते. आपण माणुस आहोत त्यामुळे आपल्यालाही कधीतरी राग येणार वाईट वाटणार हे सगळ स्वाभाविक आहे. सामाजिक कार्य करत असतांना तुम्हाला येणारे अनुभव तसे आहेत की कधीतरी ते खूप मनाला समाधान देणारे असतील आणि कधी अनपक्षितपणे धक्का देणारे असतील अशा वेळेला ते भान ठेवणं हे खूप गरजेचे आहे. दुसर मला असं वाटतं की आपण सतत मी काय देऊ शकतो याचा विचार करणं गरजेचं आहे. पण मी. यातून काय शिकू शकतो याचंही भान ठेवणं गरजेच आहे. आज एखादी गोष्ट जमली नाही, आज एखादी गोष्ट करता आली नाही किंवा आज अपेक्षित परिणाम मिळाला नाही, ठीक आहे, आज संपणार आहे आणि उदया येणारच आहे कारण बदल ही अटळ गोष्ट आहे.

अगर आप किसी चिज की शिध्दत से चाहो तो पुरी कायनात आपके साथ ही जाती है।
म्हणजे तुम्ही त्यादृष्टीने आजुबाजुच्या परिस्थितीकडे बघायला लागला म्हणून त्या गोष्ट तुम्हाला सापडतात त्यामुळे मला अस वाटत की कार्यकर्ता म्हणून आपण नेहमी हे एक भान ठेवाव की काम करत असताना मला आनंद मिळतोय का ? आणि मी दुसऱ्या कुणाच नुकसान करत नाही ना ?

त्या गोष्टीचा अपेक्षित परिणाम मला मिळाला की नाही मिळाला ही बाब दुसरी आहे. त्याविषयी विचार करता येऊ शकतो, परिणाम कारकता वाढवता येऊ शकतो पण कामाच सातत्य टिकवायच असेल तर मात्र आपल्याला त्या कामातुन आनंद मिळतो आहे की नाही हे आपण बघितल पाहिजे जर का त्या कामातुन आपल्याला आनंद मिळत नाही तर शोधल पाहिजे की का आनंद मिळत नाही ? अस काय आहे ? जे आपल्याला खुपलयं.

---

महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रिया त्यांचे स्थान आणि समस्या :

आदिवासी जीवनाविषयीची एखादी कादंबरी किंवा कथा वाचली किंवा जव्हार, जुन्नर इत्यादिसारख्या तालुक्याच्या ठिकाणी आठवडयाच्या बाजाराला नटून थटून आलेली एखादी आदिवासी स्त्री पाहिली की, साहजिकच मनात विचार येतो की, आम्हा शहरी स्त्रियांपेक्षा या आदिवासी स्त्रिया किती आनंदी स्वच्छंदी असतात. त्यांच्या समाजात त्यांना किती स्वातंत्र्य आहे तेथे त्यांना कोणतीच बंधने नाहीत किंवा समस्या नाहीत. परंतू हे विचार आदिवासी भागांमध्ये प्रत्यक्ष जाऊन आल्यावर त्यांच्या चालीरीती, धार्मिक, सामाजिक, राजकिय व्यवस्थेचा अभ्यास केल्यावर विसरून जातो. या आदिवासी स्त्रियांच्या स्वच्छंदी जीवनालाही काळी बाजू आहे, त्यांनाही काही समस्या आहेत. या काळया बाजुने त्या जरूर झाकोळल्या आहेत पण त्यातूनही त्या मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसून येते.

प्रस्तुत लेखामध्ये आदिवासी स्त्रियांचे त्यांच्या समाजात असलेले स्थान आणि त्यांच्या समघ्या यांचा मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टिने आदिवासी स्त्रिचे राजकीय, आर्थिक, सामाजिक इत्यादि क्षेत्रामध्ये काय काम आहे याचा अभ्यास केलेला आहे. आदिवासी समाजात स्त्रियांचे स्थान संस्कृती ठरवीत असते. या संस्कृतीच्या चौकटीमुळेच त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार आदिवासी भागात झाला, तसेच त्यांच्यातील अंधश्रध्देचे निर्मुलन केले गेले तर त्या स्त्रियांच्या समस्या सोडविण्याच्या हेतूने मदत होईल. या दृष्टिने प्रस्तुत लेखामध्ये पुढील मुद्दयाची चर्चा केलेली आहे.

१- आदिवासी संस्कृतीमध्ये आदिवासी स्त्रीचे स्थान
२- आदिवासी स्त्रियांच्या समस्या
३- या समस्या सोडविण्याचे मार्ग

जुन्नर, नाशिक, ठाणे आणि धुळे या जिल्हयांतील आदिवासी भागात जाऊन क्षेत्र पध्दतीने मिळविलेल्या माहितीच्या तसेच विवरणात्मक टिपणांच्या आधारे वरील मुद्दयांची चर्चा केलेली आहे. क्षेत्र पध्दतीने पुढील आदिवासी जमातीचा अभ्यास केलेला आहे.



ARTS & U.K. COMM. COLLEGE AKOLA

हिंदु महादेव कोळी :

ही आदिवासी जमात महाराष्ट्रातील बऱ्याचशा भागात विखुरलेली आहे. तथापी पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यामध्ये असलेल्या लहान लहान गावातून राहणाऱ्या महादेव कोळी या जमातीचा अभ्यास केलेला आहे.

कोकणा, ढोर कोळी, कातकरी आणि ठाकर :

या आदिवासी जमाती ठाणे आणि नाशिक जिल्हयांतील लहान लहान गावांमधून राहतात.

पावरा आणि भिल्ल :

धुळे जिल्हयातील लहान लहान गांवांमधुन या आदिवासी जमाती राहतात.

हे सर्व भाग सहयाद्रीच्या तसेच विंध्य आणि सातपुडा या पर्वतरांगांनी आणि दाट जंगलांनी वेढलेले आहेत. या लोकांनी त्यांची स्वतःची वेगळी भाषा आहे. या सर्व जमातींचा मुख्य व्यवसाय शेती हा असून आजही तो अप्रगत व्यवस्थेत आहे. याशिवाय मच्छीमार, लाकुडतोड, मध गोळा करणे इत्यादी दुय्यम प्रकारचे व्यवसाय हे लोक करतात. सभोवताली जंगल असल्यामुळे त्यांचे जीवन जंगल आणि जंगल संपत्तीवरच विशेषतः अवलंबून आहे.या आदिवासी स्त्रियांना त्यांच्या समाजात काय स्थान आहे याचा विचार करण्यापुर्वी आदिवासी संस्कृतीचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे.

आदिवासी हा समाज जंगलात, दऱ्याखोऱ्यात, जंगल कपारीत राहणारा असा समाज आहे. अप्रगत अवस्थेतील शेती आणि शिकार ही या समाजाची उपजीविकेची साधने होत. दुर्गम भागात राहत असल्यामुळे शहरी जीवनाशी संबंध तुटलेला आहे. त्यामुळे त्यांची स्वतःचीच आचार विचार पध्दती तयार झालेली आहे. या आचार पध्दतीद्वारा ते आपआपसातील तंट्टे जसे सोडवितात त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याचाही प्रयत्न करतात. या त्यांच्या प्रयत्नांतूनच जादु, टोणा, भुत, चेटकी इत्यादींचा उगम झालेला आहे. आजही या आदिवासी समाजात मैखिक परंपरा दिसून येते. अशा तऱ्हेने राजकीय धार्मिक आर्थिक सामाजिक अशा विविध अंगानी आदिवासी संस्कृती तयार झालेली आहे.

थोडक्यात आदिवासी संस्कृतीची पुढील वैशिष्टये आपल्याला दिसुन येतात.

१- आदिवासींची स्वतंत्र आचार आणि विचार पध्दती आहे.

२- त्यांची स्वतंत्र भाषा आहे.

३- नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करून घेण्यासाठी तसेच निसर्गाविशयी वाटणारे प्रेम व्यक्त करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांतून धर्म आणि जादुटोणा निर्माण झाला.

४- त्यांच्या समाजाची जात पंचायत असून समाजांतर्गत प्रश्न ही समिती सोडविते.

५- आजही त्यांच्यामध्ये मौखिक परंपरा अस्तित्वात आहे.

बालपण :

शहरी लोकांप्रमाणे आदिवासींमध्ये मुलगा किंवा मुलगी असा भेदभाव केला जात नाही. असे असण्याचे कारण म्हणजे मुलीच्या लग्नात वडिलांना वधूमूल्य मिळते. तसेच या संस्कृतीमध्ये मुलगी ही आर्थिकदृष्टया जमेची बाजू असते. त्यामुळे त्यांच्यामध्ये मुलगी आणि मुलगा दोघांनाही समान वागणूक मिळते. परिणामी आदिवासींमध्ये जन्माला येणाऱ्या मुलाचे तसेच मुलीचे सारख्याच पध्दतीने होते.

आदिवासींमध्ये मुलगा किंवा मुलगी असा भेदभाव नसला तरीही लहानपणापासूनच त्यांच्यावर वेगवेगळे संस्कार केले जातात. मुलीला पुढे लग्न झाल्यावर घरकाम करावे लागणार, चुलमुल सांभाळावे लागणार या विचाराने तिला तसे शिक्षण दिले जाते. बालपणी तिचे खेळही तशाच प्रकारचे असतात. थोडी मोठी झाल्यावर घरकामात ती आईला मदत करते, पाणी आणणे, जंगलातुन इंधन आणणे, लहान मुलांची काळजी घेणे इत्यादी बारीकसारीक कामे ती करते.

वैवाहिक जीवन :

लग्नापुर्वी आदिवासी स्त्रिला बरेच स्वातंत्र्य असते परंतु लग्नानंतर मात्र तिच्यावर अनेक बंधने पडतात. कामसू, सदृढ, स्वच्छ निटनेटकी आदिवासी स्त्रि सुंदर समजली जाते असे असले तरी तिच्या बाह्यरूपाचा किंवा सौदर्याचा वधूमूल्याशी संबंध येत नाही. बहुतेक सर्व आदिवासी जमातीमध्ये हे मुल्य ठरलेले असते ते अंदाजे रू. ४०० पासुन रू. १००० पर्यंत किंवा धान्याच्या पोत्याच्या स्वरूपातही असते. कधी कधी वधूमूल्य म्हणून वधूला दागिनेही घातले जातात.

येथे वधूमूल्याच्या संदर्भात थोडे स्पष्टीकरण करणे आवश्यक वाटते. आदिवासीमध्ये प्रचलित असलेल्या वधूमूल्य या प्रथेला सामाजिक आणि नैतिक महत्व आणि अर्थ आहे. लग्नाप्रसंगी वधूच्या आईवडिलांना बऱ्यापैकी आर्थिक झळ लागते काही वेळेस त्यांना कर्जबाजारीही व्हावे लागते. अशावेळेस वरपक्षाकडील लोक मदत म्हणून फुल ना फुलाची पाकळी ही वधूमूल्याच्या रूपाने वधूपक्षाला देतात. वधूमूल्याचे स्वरूप विनिमयमूल्य असे नसते. वधूमूल्य देण्यामागे वधूला विकत घेतली ही भावना नसून वधूमूल्याच्या स्वरूपात आपल्या होणाऱ्या सोयऱ्यांना केलेली ती मदत असते. म्हणूनच वधूमूल्य या प्रचलित रिवाजाला नैतिक आणि सामाजिक आशय आणि महत्व आहे.

वैधव्य :

हिंदू समाजात स्त्रिचे वैधव्य सामाजिक व धार्मिकदृष्टया त्याज्य आहे. स्त्रिला वैधव्य आले तर तिला त्याची फार मोठी किंमत द्यावी लागते. लग्नप्रसंगी तसेच अनेक मंगलप्रसंगी तिची उपस्थिती नाकारली जाते. विधवा स्त्रिया एकाकी पडलेल्या दिसतात. तरूण विधवा स्त्रियांची अवस्था



AKOLA
S.N. and U.K. COLLEGE LIBRARY

तर फारच शोचनीय असते. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, विधवा स्त्रिने आपला नवराच केवळ गमावलेले असते. आजही तिचा पुर्नविवाह मान्य केला जात नाही.

परंतु आदिवासी समाजात मात्र विधवा स्त्री आणि सुवासिनी यांच्यात फारसा फरक केला जात नाही तिला पुर्नविवाहही सहज करता येतो. वारली आदिवासीमध्ये प्रचलित असलेल्या 'काज' या विधीला या दृष्टीने महत्व आहे. 'काज' हा वर्षश्रादाचाच प्रकार आहे. या दिवशी त्या निमित्याने नविन सोयरिक जमविली जाते. अर्थात विधवेने पुनर्विवाह करावा किंवा नाही हे सर्वस्वी विधवा स्त्रिच ठरविते म्हातारपणी आदिवासी स्त्रिकडे तिची मुले जातीने लक्ष देताना दिसतात. तरूणपणी केलेले कश्ट आणि अल्प आहार यामुळे आदिवासी स्त्री लवकर वयस्कर दिसायला लागते. तिचे सौंदर्य नाहीसे होऊन ती कुरूप दिसते. म्हातारपणीसुध्दा तिला करता येण्याजोगी कामे ती करीत असते. दुदैवाने म्हातारपणीसुध्दा तिची मुले तिच्याकडे लक्ष देतात हे पाहून असे म्हणावेसे वाटते की ती नशीबवान आहे. म्हातरपणीही तिला कौटुबिंक जीवन आणि वातावरण यापासुन वंचित व्हावे लागत नाही. शहरातील वृध्दांप्रमाणे तिला वृध्दाश्रमाचे तोंड पाहावे लागत नाही आदिवासी स्त्रियांवर होणारे अत्याचार, जुलुम कसे थांबवावेत हा एक ज्वलंत प्रश्न आदिवासी समजापुढे आहे. जंगल अधिकारी, समाजसेवक वगैरे मंडळी आदिवासी स्त्रियांवर बलात्कार करतात. ढेबरभाई आयोगाच्या चौकशीसाठी महालात गेले असताना त्यांनी आदिवासींना विचारले 'तुम्हाला आमच्यापासून काय हवे ? तेव्हा लोकांनी त्यांना सांगितले की तुम्ही तुमच्या अधिकाऱ्यांना परत घेऊन जा ते आमच्या स्त्रियांना नासवतात आदिवासी स्त्रीवर होणारे हे अत्याचार थांबायचे असतील तसेच त्यांच्या समस्या सोडवायच्या असतील तर त्यांना शिक्षण देऊन सुशिक्षित केले पाहिजे म्हणजे त्यांच्यातील अंधश्रध्देचे निर्मूलन होईल आणि त्यांच्या समस्या सोडविण्यास मदत होईल.

**कु. माधुरी ढोके**
**बी.ए.अंतिम वर्ष**

## समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी स्वयंसेवी संस्था एक आशीर्वाद

समाजातील दुर्लक्षित आणि दुर्बल घटकांना मदतीचा हात देणाऱ्या स्वयंसेवी संस्था लाखमोलाचे काम करत असतात. या संस्था समाजाच्या जडणघडणीत मोठा हातभार लावत असतात. एखादी गोश्ट आयती देण्यापेक्षा ती कशी मिळवायची हे शिकवलं तर ती व्यक्ती सुखी होईल हाच आधार मानून गेली अनेक वर्शे काही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, त्यामुळे समाजासाठी त्या संस्था कार्यरत आहेत. अशा खुप स्वयंसेवी संस्था आहेत. ज्या लोकांना वेगवेगळया पद्धती वेगवेगळया कार्याने लोकांना खायला, प्यायला, राहायला, जे लहान लहान मुले असतात, ज्यांना पालक नसतात कोणी जीवन जगण्यासाठी आधार नसतो, अशा लोकांना मदत करणे, त्यांचे पोट भरणे, त्यांना साहायता करणे हया संस्था अशा प्रकारे कार्य करीत असतात.

समाजातील दुर्बल लोकांना मदत करणे त्यांच्या गरजा भागवणे अशा प्रकारचे कार्य हया संस्था करतात. परंतु फक्त हेच कार्य नव्हे तर खुप सारे कार्य आहेत जे स्वयंसेवा संस्था त्यांच्यासाठी कार्यरत असतात. मागील काही वर्शात लोकांवर कोरोना ही नावाची बिमारी (महामारी) खुप साऱ्या संकटांशी समोरे जावे लागले. श्रीमंत लोकांना गरिब लोकांना यांचा खुप त्रास झाला. खुप लोकांना कोरोना झाला होता. काही लोक मृत्युमुखी सुद्धा पडले. पण ज्या लोकांना या महामारी मुळे खायला मिळण ही शक्य नव्हतं बेरोजगारी वाढली होती. जे गरजू लोक होते त्यांना अशाप्रकारच्या स्वयंसेवी सस्थांनी ज्यांच्या गरजा भागवल्या त्या लोकांना औशधी अन्न त्यांना लागणाऱ्या गोश्टींचा पुरावठा हया स्वर्यसेवी संस्थानी लोकांना केली आणि हया संस्था फक्त हेच नव्हे तर एड्सविशयी जनजागृती करून लोकांच्या मनातले गैरसमज दुर करणे त्यांना मार्गदर्शन करणे, व्यसनमुक्ती करिता पावले उचलणे, लोकांना व्यसनापासुन मुक्त करणे अशाप्रकारे कार्यही स्वयंस्वेवी संस्था करतात. स्वयंसेवी संस्था म्हणजे इतरांचे जीवन सुधारण्यासाठी समर्पित असलेल्या संस्था आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था भारतातील शिक्षणासाठी कार्य करत आहे. ज्याची शिक्षण मिळवण्याची परिस्थिती नाही त्यांना शिक्षण मिळवून देण्यासाठी त्यांची मदत करतात. अनेक संस्था अशाही आहेत ज्या दवाखाने रोग उपचार ज्या मोठ मोठया रोगांवर उपचार करण्यासाठी कार्यरत आहेत. उदा. कॅसर सारख्या रोगांवर जे लोक उपचार करू शकत नाहीत ज्यांच्याकडे पैसे नसतात त्यांना मदत करणे कमी पैसा घेऊन त्यांच्या रोगांवर उपचार करतात अशा प्रकारचे कार्य स्वयंसेवी संस्था करतात काही संस्था ग्रामीण भागात ज्या सोयीसुविधा पोहचवितात त्यांना ज्या सोयी मिळत नाही त्यांना सोयी मिळवून देणे हे कार्य करतात आणि काही स्वंयसेवी संस्था आश्रमे सुद्धा चालवतात. उदा. बाल गृह आश्रम, वृध्दाआश्रम जे मुल अनाथ आहेत त्यांना संभाळतात अशा प्रकारचे कार्य संस्था करत आहेत. त्याचमुळे समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी स्वयंसेवी संस्था हे एक आशिर्वादच आहे.

**कु.रोशनी जानिकीराम राठोड**
**बी.ए.अंतिम वर्ष**



U.K. COM. COLLEGE AKOLA

## डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक विचार

परिचर : बाबासाहेब आंबेडकर १४ एप्रिल, १८९१ – ०६ डिसेंबर, 1966 हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौध्द चळवळी प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरूध्द होणारा सामाजिक भेदभाव नश्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले.

डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांचा मुख्य विशय अर्थशास्त्र होता. या विशयावर त्यांनी विपूल लेखन केले आहे. आदर्श चलन पध्दती, कृशी उद्योग, खासगी सावकार, प्रतिबंधक विधेयक, जातीचे अर्थशास्त्र, आर्थिक पायाभरणी इत्यादी विशयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार मांडले आहेत. भारताची केंद्रिय बॅक भारतीय रिझर्व बॅकेच्या स्थापनेत बाबासाहेबांचे मोठे योगदान आहे. भारताच्या किर्तीवंत सुपुत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रस्थानी आहे. भारत देशाच्या इतिहासातील पहिले सर्वश्रेश्ठ अर्थशास्त्र हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. देशाच्या सामाजिक राजकीय क्षितीजावर त्यांचा उदय इ. स. 1920 च्या दशकात झाला. समाजाच्या अस्पृश्य म्हणून हिणविल्या गेलेल्या अगदी तळातील वर्गाच्या पुनरूत्थानासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक पातळीवर तेव्हापासून त्यांचा संघर्श सुरू होता. बाबासाहेब एक थोर विचारवंत होते आणि त्यांनी अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, विधिज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार, संसद सदस्य आणि या सर्वांच्या पलीकडे जाऊन समाजसुधारक आणि मानवाधिकारांचा रक्षक या नात्याने केलेले कार्य अतुलनीय आहे. देशभरातील अस्पृश्य समाजाला एकवटून संघटित करून सामाजिक समतेच्या ध्येयाप्रत जाण्याच्या मार्ग कसा अवलंबायचा याविशयी त्यांनी दिशादर्शन केले.

अस्पृश्य समाजा मध्ये जन्मलेल्या बाबासाहेबांनी देश विदेशातल्या तीन खंडातून उच्च शिक्षण प्राप्त केले. कोलंबिया विद्यापीठाची अर्थशास्त्रातील पी. एच. डी. (1917), लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मधुन डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी तसेच लंडनमधील ग्रेज इन्ची बार ॲट लॉ (1923) अशा अतिउच्च पदव्या त्यांनी संपादित केल्या. दलित समाजातील विद्यार्थ्यांने त्या काळात अशा प्रतिष्ठेची पदव्या मिळविणे ही अद्वितीय बाब होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूळ अभ्यासविशय अर्थशास्त्र हाच होता. बाबासाहेबांनी अर्थशास्त्रावर विपुल लिखाण केले असुन या विषयावर याची तीन प्रमुख पुस्तके आहेत.

1. ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनास ऑफ दि ईस्ट, इंडिया कंपनी
2. दि. इन्होल्युशन ऑफ फोव्हिशियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया
3. दि प्रॉब्लेस ऑफ द रूपी इटस ओरिजिन ॲन्ड इटस सोल्युशन

पहिली दोन पुस्तके सार्वजनिक वित्तव्यवस्थेवरील असुन त्यातील पहिल्या पुस्तकात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातील वित्तव्यवहारावर भाष्य केले आहे. दुसरे पुस्तक ब्रिटिशांच्या आमदनीतील भारतात वित्तीय व्यवहारात भाष्य करते. हा कालखंड इ. स. 1833 ते इ. स. 1921 असा आहे. त्यांच तिसरे पुस्तक चलनविषयक अर्थशास्त्रावरील एक उत्कृष्ट ग्रंथ मानल्या गेला आहे. या पुस्तकात इ. स. 1800 पासून इ. स. 1893 पर्यंतच्या कालखंडात विनिमयाचे माध्यम म्हणून भारतीय चलनाची कशी उत्क्रांती 1920 च्या दशकाच्या पूवर्धिती सुयोग्य चलनाची निवड करण्यात आलेल्या अडथळयाचीही चर्चा त्यानी बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर एकही पुस्तक लिहीले मीही मात्र त्यांच्यातील अर्थतज्ज्ञ वारंवार डोकावत राहतो.

बॉम्बे लेजिस्लेटिव्ह असॅब्लीचे सदस्य असतांना (1926) ग्रामिण भागातील गरिबांच्या समस्याविषयीचे त्यांचे सभग्र आकलन त्यांनी उभारलेल्या जनआदोलनामंध्ये प्रतिबिंबित होते. शेतीमधील खोती पध्दतीविरूध्द त्यांनी केलेल्या शुध्द गुलामगिरीविरूध्द त्यांनी आवाज उठविल्यानंतर ग्रामीण भागातील गरिबांचा मोठा वर्ग शोषणमुक्त झाला. सावकारांच्या मनमानीला चाप लावण्यासाठी त्यांनी असेम्बलीमध्ये विधेयक आणले. औद्योगिक कामगारांच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांनी इ. स. 1926 मध्ये स्वतत्र मजुर पक्षाची स्थापना केली. त्याकाळी कामगारांचा आवाज बुलंद करणाऱ्या अन्य संघटना होत्याच, मात्र त्यांना अस्पृष्य कामगारांच्या मानवधिकारांशी काहिही देणे घेणे नव्हते नव्या राजकीय पक्षाने ही उणीव भरून काढली. त्याचप्रमाणे व्हॉइसरॉयज, एक्झिक्युटिव्ह, कैन्सिलचे कामगारच सदस्य या नात्याने 1942 ते 1946 या काळात डॉ. आंबेडकर यांनी कामगार विषयक धोरणात आमुलाग्र सुधारणा घडवून त्याचप्रमाणे व्हॅाली प्रकल्पाचा यात प्राधान्याने भुमिका बजावली दामोदर प्राधान्याने समावेश करावा लागेल.

**कु. प्रेरणा प्रकाश डहाणे**

बी.ए.अंतिम वर्ष

**चांगला गुरु यशाचे दरवाजे उघडून देऊ शकतो, पण त्यातुन यशाच्या दिशेने जाण्यासाठी स्वतःलाच चालावे लागते**

**संधी आणि सुर्योदय या दोघांमध्ये एकच समानता आहे ती म्हणजे उशिरा जाग येणा-यांना या दोन्ही मिळत नाही.**



AKOLA

## मेरी माटी मेरा देश

भारत की आजादी के 75 वर्श के पुरे होने और आजादी के अमृतमहोत्सव का समापन करने के लिए 'मेरी माटी मेरा देश' अभियान की शुरूआत की गई है। यह अभियान हमारे देश के शहिद स्वतंत्रता सेनानियों को श्रध्दांजली देने का एक प्रयास है। आजादी की लडाई एक संग्राम था, जिसमें आजादी के लिए ना जाने कितने योध्दाओ. ने अपने प्राण न्यौछावर कर दिए। आजादी की यह लडाई समुचे भारत मे लडी गई, अलग राज्य और हिस्सो के सेनानियों ने स्वतंत्रा की लढाई में अपना योगदान दिया।

हम अपने परिवार से प्यार करते है, क्योंकि वे हमें प्यार और समर्थन देते है। हम अपनी नौकरी से प्यार करते है क्योंकि यह हमे पैसे देती है। हम अपने शौक से प्यार करते है क्योंकि इससे हमे खुशी मिलती है। लेकिन हम उसे भुल जाते है जो हमें रहने के लिए जगह देता है, जीवन की शांति देता है और इसके अलावा वह आजादी देता है जिसका हम आनंद लेते है। हम भाग्यशाली है कि हमारे देश ने हमें जीने के लिए एक खुशहाल जीवन दिया देश की आजादी की विशेश पर्व को मनाने के लिए हम 15 अगस्त को भारत का स्वतंत्रता दिवस मनाते हैं।

इस आजोजन को और अधिक सफल बनाने के लिए प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदीजी ने ''मेरी माटी मेरा देश'' नाम से एक से एक अभियान शुरू किया।

माटी @ मिट्ट्री एक अनमोल धरोहर है जो हर व्यक्ती के लिए एक महत्वपुर्ण संसाधन है। यह हमारे जीवन का आधार बनती है, जिससे हमारी पोशण एवं संरचना होती है। मेरी मिट्ट्री ने मुझे शिक्षा दी है मेरा संस्कार निर्मित किया है और मेरे विकास के मार्ग मे मदद् कि है।

मेरी मिट्ट्री के समृध्दी और संसाधनो के कारण, हमारे देश में विभिन्न प्रकार कि खेती और उद्योग विकसित हुए है। यहां कृशि हमारे लिए आत्मनिर्भरता का माध्यम बनती है, जबकि उद्योग हमे विश्वस्तरीत बाजार मे स्थान बनाने में मदद् करते हैं।

मेरी मिट्ट्री के सुंदर वन्य जिवन और प्राकृतिक सौंदर्य ने मुझे अपने पर्यावरण के प्रति संवेदनशिल बनाया है। हमारे देश में विभिन्न प्राकृतिक स्थल नदिया और पर्वतों का समृध्द विकास है जो पर्यटको को आकर्शित करते है।

मेरी मिट्ट्री के साथ हमारा संबंध विश्वास का एहसास दिलाता है। हम इसकी सुरक्षा और संरक्षण के लिए प्रतिबध्द होने के साथ साथ इसके साथ अन्य समृध्द धरोहरों को भी संरक्षित करने के लिए प्रेरित होते हैं।

मेरी माटी मेरा देश अभियान के तहत देश के अलग अलग राज्यो के ग्रामो से 7500 कलशो मे मिट्ट्री लाई जाएगी। इस मिट्ट्री को दिल्ली लाकर अमृत वाटिका का निर्माण किया जाएगा। देश के सभि ग्राम पंचायतो मे सेनानियों कि याद मे स्मारक बनाकर उन शहीदो के नाम अंकित किए जाएंगे जिन्होने स्वतंत्रता संग्राम मे अपना योगदान तो दिया लेकिन व अबतक गुमनाम रहे हैं।

यह अभियान उन्ही गुमनाम शहींदो को सन्मान देने उनके बलिदान को सलाम करने का एक अवसर है। हमारे देश के सभी स्वतंत्रा सेनानी भारत को एक ऐसे देश के रूप में देखना चाहते थे, जहां सभी लोग एक साथ रहते हो यहा पर देश के किसी भी हिस्से का बटवारा ना हुआ हो।

मेरी माटी मेरा देश है। क्योंकि यह हमारे संस्कृती परंपरा और भाशा का घर है। हर भारतीय अपनी मिट्ट्री से गहरा संबंध रखता है। यहॉ विभिन्न घरोघर, रंग, भाशा और जिवनशैली मिलती है जो हमारे देश को विशेश बनाती है।

एक अदभुत उपहार है। मेरी मिट्ट्री मेरा देश, जो हमे हमारे देश की महिमा, समृध्दी और विविधत के प्रति गर्व महसुस करता है। हमे अपनी मिट्ट्री का समान करना चाहिए और इसे सुरक्षित रखने के लिए प्रतिबध्द रहना चाहिए।

मिट्ट्री है तो हम है। मिट्ट्री नहि तो कुछ भी नही मिट्ट्री के कारण हम जिंदगी जि रहे है। मिट्टी से हमें फुले फल और वे सब मिलता है जिसका हमे जरूरत है। ''मेरी माटी मेरा देश'' अभियान एक महत्वपुर्ण नागरिक अभियान हमें अपनी मातृभुमि की महत्वपुर्णता का समझने और सुरक्षित रखने की महत्वपुर्णता का अवगत कराता है।

हमें स्वच्छता और पर्यावरण संरक्षण और समाज मे सुधार के प्रति संकप्रत होने की प्रेरणा मिलती हैं। यह अभियान हमें एक दुसरे के साथ मिलकर काम करने की महत्वपुर्णता को समझाता है और देश के विकास में हमारे सभी का योगदान महत्वपुर्ण है।

''मेरी माटी मेरा देश'' अभियान ने हमे देशभक्ती की भावना को मजबुत करने के लिए प्रेरित किया है और हमें एक सशक्त और सद्‌गुणी भारत की दिशा में प्रगति करने की प्रेरणा प्रदान की है।

समाप्ति में '' मेरी मिट्ट्री मेरा देश '' एक अदभुत उपहार है, जिसके कारण हम अपने भारत देश को विकसशील से विकसित भारत बना सकते है, हम अपने मिट्ट्री का विकास कर सकते है।

और अंत मे यह करना चाहती हु,

'' लहरा लो तिरंगा घर घर मे प्यारे,  
मना लो आजादी का अमृत महोत्सव सारे ''

**कु.मनिषा संजय गवई**  
**बी.कॉम. व्दितीय वर्ष**

देवासाठी पैसा खर्च करू नका. तोच पैसा शिक्षणाला द्या. मंदिराची भर करू नका. जो विद्यार्थी हुशार आहे, तो पैसा त्याला द्या. धर्मकृत्य करण्यासाठी नाही, विद्या घेण्यासाठी पैसा खर्च करा.





AKOLA

## स्त्रीजीवन - एक संघर्ष

आज आपण २१ व्या शतकात राहतो. आपण सर्वच क्षेत्रांत खूप प्रगती केली आहे. पण आजही आपण एक गोष्ट पाहतो कि ज्यामध्ये अजून आवश्यक तितकी प्रगती झालेली नाही. ते म्हणजे स्त्रियांचे घरातील समाजातील, खालचे / दुय्यम स्थान. आज महिला आपल्याला पुरुषाबरोबर काम करतांना दिसतात. बस चालवतात, विमान चालवतात, अंतराळात पण जातात, आज महिला शिक्षक, राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री इ. पदांवर कार्य करतांना दिसून येतात. पण आपण जर काळजीपूर्वक पाहिले तर खूप कमी महिलांना ही संधी मिळते. जास्तीत जास्त महिला या घराच्या कामातच गुंतलेल्या आहेत. आजही महिलांना घरात किंवा समाजात पुरुषाइतके स्थान नाही. त्यांना पुरुषांच्या मर्जीनेच काम करावे लागते.

आज आपण पाहिले तर परिस्थिती ठिक वाटत असेल. पण आजही गावात आपल्याला स्त्रियांवर होणारे घरगुती अत्याचार पाहायला मिळतात. आजही बालविवाह पध्दत आहे. आजही मुलींना मुलांइतका भाव नाही, आजही लिंग ओळखून स्त्री भ्रूणहत्या होत आहे. आजही स्त्रियांवर शारिरीक व मानसिक अत्याचार होत आहे. उलट यामध्ये वाढ झालेली. सरकारने स्त्रियांचे सुरक्षितेसाठी नवीन कायदे केले आहेत, पण त्यांचा सकारात्मक परिणाम आपल्याला पाहायला मिळत नाही.

मला प्रश्न पडतो की आपण स्त्रियांना अशी वागणूक का देतो ? ती जननी आहे, ती जन्म आहे, तिच जीवन आहे. स्त्री प्रत्येकवेळी एक आई, बहीण, पत्नी, मैत्रीण इ भुमिका व्यवस्थितरित्या पार पाडतात. पण पुरुषवर्ग स्वतःलाच वर्चस्वी दाखवतात. असे असले तरी स्त्रियांनी हिंमत मात्र सोडली नाही. त्या पडतात आणि पुन्हा उठतात त्यांच्यात खुप धैर्य, शौर्य आहेत. मला खात्री आहे की खरे पुढील काही वर्षांनी स्त्रिया आपल्याला पुरुषांच्या बरोबरीने दिसतील अजून महिलांना संघर्ष करावाच लागेल. त्यांना खरे स्वातंत्र्य मिळवावेच लागेल. त्यांचे खरे स्वातंत्र्य म्हणजे त्यांना स्वतः विषयी निर्णय घेण्याचे अधिकार मिळेल. त्यांच्याकडे दुय्यम नजरेने पाहिले जाणार नाही. समाजातील स्त्रीविरोधी घटक संपेल. बल नष्ट होऊन जाईल. थोडे कठीण आहे पण नक्कीच शक्य आहे.

## स्त्री – शिक्षण आणि विकास

"स्त्रीच्या व्यक्तिमहत्त्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्वाचे साधन म्हणजे स्त्रीशिक्षण होय."

भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षण हा भारतातील प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे. परंतु भारतातील महिला शिक्षणाची स्थिती अजूनसुद्धा अवघड आहे. स्त्री-शिक्षण हा एक मूलभूत अधिकार आहे. परंतु भारतातील प्रत्येक राज्याच्या तुलनेत लिंग साक्षरतेच्या दरामध्ये बराच अंतर आहे. उदाहरणार्थ, केरळमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण ९२% आहे, तर बिहारमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण ५०% आहे. जागतिक स्तरावरील पुरुष साक्षरतेच्या तुलनेत महिलांमध्ये एकूणच साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे.

महिलांच्या शिक्षणाने समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण भुमिका बजावली जाते. सुशिक्षित महिला मुली-मुलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देतात आणि मुलांना अधिक चांगले मार्गदर्शन देखील करतात.भारतातील महिला शिक्षणाचा इतिहास -

वैदिक कालखंडात, भारतातील स्त्रियांना शिक्षणापर्यंत प्रवेश होता, परंतु काही काळानंतर हळूहळू त्यांचा हक्क गमावला. ब्रिटीश काळात भारतातील स्त्रियांच्या शिक्षणामध्ये पुन्हा रुची निर्माण झाली. या काळात राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी अनेक प्रख्यात भारतीय व्यक्तींनी भारतातील महिलांच्या शिक्षणावर भर दिला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि पेरियार यांच्यासारख्या नेत्यांनी भारतीय महिलांना शिक्षण उपलब्ध करून दिले.

१९४७ च्या स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने महिलांच्या शिक्षणासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी पावले उचलली. याचा परिणाम म्हणून, दशकांमध्ये भारतातातील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण हळूहळू वाढले आहे.

ग्रामीण भारतातील महिला शिक्षण -

जरी शहरी भारतात महिला साक्षरतेचे प्रमाण ६४% आहे, तरीही ग्रामीण महिला साक्षरतेचे प्रमाण निम्मे आहे, म्हणजेच जवळजवळ ३१% महिलांच्या साक्षरतेच्या या कमी दरामुळे ते केवळ महिलांच्या जीवनाचाच नव्हे तर त्यांच्या कौटुंबिक आणि देशाच्या आर्थिक विकासालाही नुकसान करीत आहे. स्त्रियांचे कमी प्रजनन दर, निकृष्ट दर्जाचे जीवनमान, पौष्टिकतेचे निकष आणि घरातील मिळणारे स्वातंत्र यासारखे दुष्परिणाम विविध अभ्यासकांनी सिद्ध केले आहेत. उदाहरनार्थ, नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणात असे आढळले आहे कि, बालमृत्यूचा दर आईच्या शिक्षणाच्या पातळीशी संबंधित आहे.

भारतातील महिला शिक्षणावर परिणाम करणारे घटक -

महिलांच्या शिक्षणावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत.

१) उच्च शिक्षण प्रणालीतील महिलांची कमी उपस्थिती

जरी अमेरिका आणि चीननंतर भारत तिसऱ्या क्रमांकाच्या उच्च शिक्षण प्रणालीचा अभिमान बाळगतो, तरी उच्च शिक्षणाच्या बहुतांश संस्थांमध्ये महिलेची नोंद कमी आहे हे आश्चर्यकारक आहे.

२) भौगोलिक फरक

साक्षरता दर भारतातील सर्व राज्यांमध्ये एकसाखी नाही. उत्तरेकडील राज्यांच्या तुलनेत दक्षिणेकडील राज्ये भारतातील महिलांच्या शैक्षणिक योजनांसाठी अधिक सक्रीय आहेत

३) व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण

विद्यार्थ्यांनी व्यावसायिक शिक्षणाची निवड केली आहे कारण विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात मदत करणारे कार्यक्रम उपलब्ध करून देणे हे आहे. भारत सरकारने फक्त महिलांसाठी तांत्रिक संस्था सुरु केल्या आहेत, ज्या त्यांना वस्त्रोद्योग, अन्न, फार्मसी तंत्रज्ञान, व्यावसायिक कला इ. प्रशिक्षण देतील. महिला या संस्थांमध्ये भाग घेत नाहीत.

४) महिला शिक्षणाची गरज

१२८ देशांपैकी भारत सर्व विकास निर्देशाकांत १०५ व्या क्रमांकावर आहे. भारताची शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत आणि स्त्रियांना शिक्षणापर्यंत प्रवेश देण्यासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. मानसिक, सामाजिक आणि संरचनात्मक अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे जेणेकरून बहुतेक स्त्रिया शिक्षण प्रणालीत भाग घेऊ शकतील.

जरी महिला आणि शिक्षणाच्या आवश्यकतेसाठी स्थानिक संस्था संवेदनशील करण्यासाठी विविध संस्था आणि सरकारी योजना गुंतलेल्या आहेत, तरीही ते मुलींना शिक्षणासाठी शाळेत पाठविण्यास विरोध करतील. पालकांना आपल्या मुलीला शिक्षणासाठी पाठवण्याचे महत्त्व समजल्याशिवाय, ते त्यांचा उपयोग घरातील कामे किंवा शेतीविषय कामांमध्ये मदत म्हणून करणे कमी करणार नाहीत.



AKOLA

भारत सरकारने महिला शिक्षणाच्या अधिक चांगल्यासाठी अनेक धोरण आणि सुधारणा सुरू केल्या आहेत. परंतु आता आपल्याला अशा साध्या उपायांचा विचार करावा लागेल, ज्यामुळे भारतातील महिला शिक्षणाची स्थिती सुधारण्यास मदत होईल. आपण प्रत्येक घरापासून सुरुवात केली तर महिला शिक्षण वाढविले जाऊ शकते. आपण मुलगी मुलाला ओझे समजू नये. स्वयंपाक, कपडे धुऊन मिळण्याचे ठिकाण आणि इतर घरातील नोकऱ्या फक्त महिलांसाठी आहेत, असा विचार करणे थांबवा. स्त्रियांना मैत्रिणींना / नातेवाईकांना प्रोत्साहित करा, की मुलीचे शिक्षण फक्त थांबवू नका. कारण तिला एक उत्तम सन्मान मिळाला पाहिजे.

आज आपल्या देशात मुलींचे व स्त्रियांचे शिक्षण काळाची गरज बनलेली आहे. समाजातील स्त्री शिक्षणाचे महत्त्व भरपूर आहे. आजही देशातील अनेक ठिकाणे अशी आहेत जिथे स्त्रियांना शिक्षित केले जात नाही, ज्यांना शिक्षणाचा अधिकार नाही. एका सभ्य आणि सुशिक्षित समाजाचे निर्माण त्या देशातील शिक्षित नागरिकांमुळे होते. असे मानले जाते की एका पुरुषाला शिक्षित केल्याने एकच व्यक्ती शिक्षित होतो आणि एका स्त्रीला शिक्षित केल्याने संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. स्त्री कुटुंबाचा केंद्रबिंदू असते. ती आईच्या रुपात आपल्या मुलांना संस्कार देते. देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी पुरुषांसोबत स्त्रियांनाही शिक्षित करणे महत्त्वाचे आहे.

**आनंद राठोड**
**बी.ए.भाग-१**




## लोकसंख्येच्या विस्फोटाचे परिणाम

लोकसंखेच्या विस्फोटाची कारणे -

जन्म मृत्यू दरामधील तफावत :-

स्वातंत्रोत्तर काळात अतिशय विषयक सोयीसुविधांमध्ये बरीच वाढ झाली. यामुळे मृत्युदर निम्म्यापेक्षाही कमी झाला. सरासरी आयुर्मान ३२.१ वरून जवळपास ६८ वर्षापर्यंत वाढले आहे. परंतु जन्मदर नियंत्रण करण्याचे प्रयत्न करूनही तो कमी करण्यात फारशे यश प्राप्त झाले नाही. ५० वर्षाच्या काळात जन्मदरामधील घट केवळ मर्यादित आहे.

कमी विवाह वय :-

काही वर्षापूर्वी बालविवाह पद्धती होती. समाजसुधारकांचे प्रयत्न, स्थानकाचे कायदे यामुळे स्वातंत्र काळात बालविवाहाचे प्रमाण बरेच कमी झालेले आहे. १९०१ मध्ये मुलींचे सरासरी विवाहाचे वय ४२.२ वर्ष होते. ते १९८५ मध्ये १७ वर्ष झाले आहे. पुरुषाचे सरासरी विवाहाचे वय २२, २३ वर्ष झाले आहे. बालवयातच विवाह करून देणे हे सर्वात मोठे पुण्यकर्म आहे, अशी राज्यस्थानामधील मुलामुलींच्या पालकांची समजूत आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने मुलांचे सरासरी विवाह वय २८ ते २४ असणे योग्य असे समजले जाते. भारतात नागरी, ग्रामीण समुदायात अशात्तरेने वाढ होते, राजकीय पक्षा या परिस्थितीचा फायदा घेण्याचा म्हणजे लोकांना सत्तारूढ पक्ष विरुद्ध भडकविण्याचा प्रयत्न करतात.

शहरीमानाचा दर्जा खालावतो :-

लोकसंख्यावृद्धीचा शहरीभागाच्या दर्जाशी सरळ संबंध आहे. याच कारणामुळे भारतात स्वातंत्रोत्तर काळात पंचवार्षिक योजनेमुळे कृषि व औद्योगिक क्षेत्रात आरंभ प्रगती होऊन देखील दर मानसी उत्पन्नात उल्लेखित स्वरुपाची वाढ झाली नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे विकासाच्या योजना अपुऱ्या पडतात व शहरीमानाचा दर्जा खालावत आहे.

सामाजिक सेवा अपुऱ्या पडतात :-

शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक सुरक्षा यासारख्या अनेक सामाजिक सेवा आधुनिक काळात राज्यसंस्थेद्वारे उपलब्ध करून दिल्या जातात. प्रचंड प्रमाणात लोकसंख्या वाढ होत राहिली तर राज्याद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सामाजिक सेवा अपुऱ्या पडतात. महाविद्यालयीन शिक्षणाची वाढत्या प्रमाणातील गरज पूर्ण व्हावी, या उद्देशाने वाढत्या नोकरसंख्यामुळे आरोग्य विषयक सेवांचा फायदा सर्व लोकांपर्यंत पोहचवतानाही वाहतूक व अन्य आवश्यक सेवाबाबातही हेच घडते.

लोकसंख्यावृद्धी आणि सामाजिक समस्या :-

लोकसंख्या जास्त वाढली की, अन्नधान्याचे उत्पादन कमी पडू लागते. उपोषण व उपासमारीची समस्या निर्माण होते. दारिद्र्य, भिक्षावृत्ती बेरोजगारी या समस्या निर्मितीसाठी लोकसंख्या वृद्धी हेच कारण आहे. यातून विवाह संबधाचे विच्छेदन, घटस्फोट, कुमारी मातांचे प्रश्न, वृद्धीचे प्रश्न, भटक्या, अनाथ मुलांचे प्रश्न यासारख्या अनेक समस्या निर्माण होतात.

प्रदूषण :-

लोकसंख्येचा प्रचंड आकार हे प्रदूषणाच्या समस्येचे कारण ठरते. प्रचंड आकाराच्या लोकसंख्येचे पालनपोषण करण्यासाठी अधिकाधिक कारखाने स्थापन केले जातात. दुचाकी आणि चारचाकी स्वयंचलित वाहने आणि कारखाने सर्वात जास्त वायुप्रदूषण असलेले शहर अशी दिल्लीची स्थिती आहे. प्रदूषण ही मानवजातीसाठी महत्त्वपूर्ण समस्या ठरत आहे. तसेच घरबांधणी, जळन यासारख्या कारणासाठी ही जंगल संपत्तीचा नाश केल्या जातो.

स्थलांतर :-

स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात पाकिस्तानातील हिंदूंनी भारतात मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले. युद्धकाळातही भारतात स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढले. अशाप्रकारे श्रीलंका, बांगलादेश, नेपाल, पाकिस्तान, तिबेट देशातून भारतात स्तलांतरित होणाऱ्या लोकांची वाढती संख्या हे भारतीय लोकसंख्यावृद्धीचे एक महत्त्वपूर्ण कारण आहे.

लोकसंख्या स्फोटाचे परिणाम

आर्थिक विकासात बाधक :-

वाढती लोकसंख्या हे विकासाच्या मागील मोठ्या अडथळा असते. भारतात विकासाचे दृश्य परिणाम सर्वसामान्य लोकांना जाणवत नाही, कारण वाढती लोकसंख्या ही विकासाची सर्व करणे फस्त करून टाकतो.

बेरोजगारीची समस्या :-

सध्याच्या काळात कृषि व औद्योगिक काळात विकास झाला आहे . अनेक रोजगाराच्या संधी नव्याने निर्माण झाल्या आहेत. तरीही बेरोजगारांची बढती संख्या हा लोकसंख्यावृद्धीचा परिणाम आहे.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या संख्येत वाढ :-

लोकसंख्या वाढली कि विविध कुटुंबात वारसदाराची संख्यादेखील वाढते. शेतजमीन संखेत वाढ होत नाही दारिद्रयात वाढ होते कर्जबाजारी झालेली शेतकरी आत्महत्या सारखा अत्यंत चुकीचा मार्ग स्वीकारतात.

दरडोई उत्पन्नात घट :-

आर्थिक विकासामुळे राष्ट्राच्या सकल उत्पन्नामध्ये वाढ होते. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्नामध्ये घट होते यामुळे राहणीमानाच्या दर्जात घट होते आणि व्यक्ती दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अडकतात.

राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील दुष्परिणाम :-

लोकसंख्या वाढीमुळे सामाजिक सुरक्षेची समस्या अधिक बिकट होते.

विभिन्न नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा कमी होणे :-

खनिज तेल, कोळसा, लोखंड, तांबे या सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीचे साठे मर्यादित आहेत. लोकसंख्या वृद्धीमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा संपुष्टात येण्याची गती अधिक होते. लोकसंख्या नियंत्रित राहिल्यास नैसर्गिक साधन संपत्तीचा साठा अधिक दीर्घकाळासाठी पुरतो. ओद्योगीकरण आणि आधुनिकीकरणामुळे बहुतांश लोकांवर भौतिकवादी तत्त्वाचा पगडा निर्माण होतो. लोकसंख्या वृद्धीमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा झपाट्याने कमी होत आहे.



SHRI SHIVAJI ARTS & U.E. COMM. COLLEGE AKOLA

## Economic Ideas of Dr.Ambedkar: A Study of Their Relevance in Modern India

AnandgovindNanasahebSapkal

B.COM. Part- II Sem- IV

**Abstract**

This research paper delves into the economic ideas of Dr. B. R. Ambedkar, focusing on his writings such as 'The Problem of Rupee: Its origin and its solution', 'The Evolution of Provincial Finance in British India: A Study in the Provincial Decentralization of imperial finance', and 'Problems of Small Holdings in India and their remedies'. The current Indian economy is grappling with issues similar to those faced during Dr. B. R. Ambedkar's time, including monetary instability leading to inflation, socioeconomic implications, unequal effects on different societal strata, inefficient public expenditure, rising fiscal deficits, growing income and wealth disparities, among others. Are Ambedkar's economic thoughts pertinent in addressing these challenges and offering solutions? By examining his economic ideology, it is evident that India could have been more inclusive had his ideas been implemented in their true essence. Therefore, it is imperative for India to incorporate his economic ideology in both short-term and long-term economic planning and policy-making to foster an inclusive society.

**Key words:** Economic thoughts of Ambedkar, Multidimensional, Relevance, Planning, India's Problems, solutions

### Introduction

Dr. B.R. Ambedkar was an exceptionally dynamic and multidimensional figure in the history of mankind. Known by various titles such as 'The father of Indian constitution', 'A true leader of Indian freedom movement', 'A Bharat Ratna', 'A great dalit leader', 'A great Lawyer', and 'A great Pioneer in the field of Economics', his contributions in the field of Economics are often overshadowed by his achievements in Law and Politics. However, he received top-notch training in Economics from prestigious institutions and renowned scholars. Dr. Ambedkar obtained degrees and doctorates from esteemed universities such as London School of Economics, London University, and Columbia University. His impressive list of qualifications includes B.A. (Bombay University), MA. (Columbia University), M.Sc. (London School of Economics), PhD (Columbia University), D.Sc. (London School of Economics), L.L.D. (Columbia University), D.Litt. (Osmania University), and Barrister-at-Law (Gray's Inn, London).

Under the guidance of distinguished educators like John Dewey, James Shotwell, Edwin Seligman, and James Harvey Robinson, Dr. Ambedkar produced insightful and relevant works on Economics, particularly focusing on the Indian Economy. His notable dissertations and publications include 'The Problem of Rupee: Its origin and its solution', 'The Present Problem in Indian currency', 'Statement of Evidence to the Royal Commission on Indian Currency and Finance, 1924-25', 'Ancient Indian Commerce', 'The Evolution of Provincial Finance in British India: A Study in the Provincial Decentralization of imperial finance', 'Administration and Finance of the East India Company', and 'Small Holdings in India and their remedies'. The writings and speeches of Dr. B.R. Ambedkar have been compiled and published in numerous volumes by the department of education, Government of Maharashtra.

### Dr. B. R. Ambedkar's ideas in the field of monetary economics and Public Finance

***Historical Analysis of Indian Currency Evolution:***

In his D.Sc Dissertation, titled 'The Problem of Rupee: Its Origin and Its Solution (History of Indian Currency and Finance)', submitted at the London School of Economics, Dr. B. R. Ambedkar meticulously examined the evolution of currency in India. He focused on the often-neglected period from 1800 to 1893. Ambedkar analyzed the challenges associated with Indian currency during the early 20th century and proposed solutions to address the instability of the Indian rupee and inflation concerns.

***From Double Standard to Gold Exchange Standard:***

Ambedkar traced the evolution of the Indian rupee from a double standard (combining gold and silver) to a silver standard. However, the instability associated with the silver standard prompted its transition to a gold standard. Subsequently, the gold standard itself evolved into a gold exchange standard, where paper money was backed by foreign currency reserves of countries adhering to the gold standard.

***Merits and Demerits of Gold Standards:***

Ambedkar critically evaluated the pure gold standard versus the gold exchange standard. He favored the gold standard in a modified form, where both gold coins and paper money were used as mediums of exchange. The paper money was pledged to be redeemable in gold. In contrast, the gold exchange standard relied solely on paper money, exchangeable at a fixed rate with gold.

***Stability and Empirical Evidence:***

According to Ambedkar, the gold standard offered greater stability due to its intrinsic characteristics. Under this standard, the money supply remained more stable compared to the gold exchange standard. He supported his argument with empirical evidence from India, demonstrating that prices were more stable under the gold standard.



SHRI ... COLLEGE AKOLA

## Economic Ideas of Dr.Ambedkar: A Study of Their Relevance in Modern India

AnandgovindNanasahebSapkal

B.COM. Part- II Sem- IV

**Abstract**

This research paper delves into the economic ideas of Dr. B. R. Ambedkar, focusing on his writings such as 'The Problem of Rupee: Its origin and its solution', 'The Evolution of Provincial Finance in British India: A Study in the Provincial Decentralization of imperial finance', and 'Problems of Small Holdings in India and their remedies'. The current Indian economy is grappling with issues similar to those faced during Dr. B. R. Ambedkar's time, including monetary instability leading to inflation, socioeconomic implications, unequal effects on different societal strata, inefficient public expenditure, rising fiscal deficits, growing income and wealth disparities, among others. Are Ambedkar's economic thoughts pertinent in addressing these challenges and offering solutions? By examining his economic ideology, it is evident that India could have been more inclusive had his ideas been implemented in their true essence. Therefore, it is imperative for India to incorporate his economic ideology in both short-term and long-term economic planning and policy-making to foster an inclusive society.

